सकाळ
शुक्रवार, १२ फेब्रुवारी २०२१

## शिवाजी कॉलेजातील कार्यशाळेस प्रतिसाद

**सातारा :** छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये इंग्रजी विभागाच्या वतीने अग्रणी कॉलेज योजनेअंतर्गत नुकत्याच झालेल्या 'व्यक्तिमत्त्व विकास व संभाषण कौशल्ये' या विषयावरील कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेत कार्पोरेट ट्रेनर हेमंत भरगुडे यांनी मार्गदर्शन केले. आपली भाषा, देहबोली, आवाज आणि आपले चारित्र्य यांचा प्रभाव आपल्या संवादातून दिसतो. आपली संवाद कौशल्ये चांगली असूनही प्रत्यक्ष मुलाखतीत आपण अयशस्वी का होतो, त्याला कारण प्रत्यक्षातले वागणे पाहिले जाते. नैसर्गिकता, स्वाभाविकता, प्रामाणिकपणा हादेखील पाहिला जातो. म्हणून आपले बोलणे, वागणे, लेखन, वाचन याकडे सातत्यपूर्ण लक्ष ठेवले तर आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी होते, असे श्री. भरगुडे यांनी सांगितले. या वेळी उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. केशव पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. तानाजी देवकुळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाबासाहेब कांगुणे यांनी आभार मानले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा